## वार्ता टिपण दि.१०/०४/२०१९

## दिवसा अपहरण केलेल्या महिलेची सिनेस्टाईलने पाठलाग करुन ३ तासात सुटका गुन्हेशाखेची कामगिरी

काल दि.०९/०४/२०१८ रोजी १७/०० वा.चे.सुमा.महिला नामे सौ.सुनंदा कृष्णा महाडीक वय ५० रा.पुरम सोसायटी,धानोरी,पुणे हिस विश्रांतवाडी येथील केकान पेट्रोलपंपा समोरुन ३ अनोळखी इसमांनी स्वीफ्ट कार नं.एम.एच.१२/एचएल ८४१० पांढ-या रंगाचे गाडीत बळजबरीने घालुन पळवुन नेले आहे. अशी माहिती मिळाल्याने लागलीच खंडणी विरोधी पथकाचे अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळास भेट दिली. त्यावेळी समजले की ,वरील कार गाडी ही वाघोली वरुन फुलगावकडे जात आहे. म्हणुन खंडणी विरोधी विभागाचे अधिकारी व कर्मचारी असे फुलगावकडे रवाना झाले, सदरची वरील कार वढु बुद्रक गावाकडे जात असल्याची माहिती मिळाल्याने आंम्ही सर्वजण खाजगी गाडयांनी वढु बुद्रक गावाकडे जात असताना, एक पांढ-या रंगाची स्वीफ्ट कार अतीवेगाने कोरेगावचे दिशेने जाताना दिसली तिचा आंम्ही पाठलाग करुन गाडी आडवी घालुन सदरची कार थांबवीली.सदर कार मधिल लोंकाना बाहेर घेतले त्यात तीन महिला व चालक पुरुष यांना ताब्यात घेतले असता, त्यातील एका महिलेने मोठयाने रडुन या लोकांनी मला बळजबरीने गाडीत घालुन मारहाण करुन पळवुन नेत असल्याचे सांगीतले. म्हणुन त्यांना त्यांचा नाव पत्ता विचारता त्या महिलेने त्यांचे नाव सौ.सुनंदा कृष्णा महाडीक असे सांगीतले. त्यानंतर सदर महिलेस पळवुन घेवुन जात असलेल्या महिलांना नाव-पत्ता विचारता त्यांनर त्याचे नाव–पत्ते १) अंजली संजय घोलप वय-१९ वर्ष रा.वडगावशेरी, टेम्पो चौक, मोझेस वाडी, पुणे, (२) कविता संजय घोलप वय-४० वर्ष रा.सदर, असे सांगुन चालक ३) तुषार बबन चौधरी वय-२१ वर्ष रा.बोलेगाव ता.खेड जि.पुणे, असे असल्याचे सांगितले. त्यांना कार्यालयात आणुन पुढील कारवाईसाठी विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ही पोलीस उप आयुक्त गुन्हे मा.श्री.शिरीष सरदेशपांडे सो., सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे-१ मा.श्री.समिर शेख सो., यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस उप निरीक्षक निखील पवार, आनंद रावडे पोलीस कर्मचारी प्रमोद मगर, मनोज शिंदे, सुनिल चिखले, विजय गुरव, रमेश गरूड, फिरोज बागवान, सचिन कोकरे, मंगेश पवार, नारायण बनकर यांनी केली आहे.